C M Y K

Government of Karnataka

# माय मराठी

## Marathi First Language

## 3

©KTBS
Not to be republished



**Karnataka Textbook Society®**
100 Ft Ring Road, Banashankari, III stage,
Bangalore-85

# Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities
- learning to shift from rote methods
- enriching the curriculum beyond textbooks
- learning experiences for the construction of knowledge
- making examinations flexible and integrating them with classroom experiences
- caring concerns within the democratic policy of the country
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries- integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge

The new books are produced based on three fundamental approaches namely. Constructive approach, Spiral approach and Integrated approach

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/ her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

The most important objectives of teaching language are listening, speaking, reading,

©KTBS Not to be republished

writing and reference work. These skills have been given a lot of importance in all the language textbooks. Along with the inculcation of these skills, fundamental grammar, opportunities for learners to appreciate beauty and imbibe universal life values have been integrated in language textbooks. When learners master these competencies, they would stop studying textbooks for the sake of passing examinations. In order to help learners master these competencies,, a number of paired and group activities, assignments and project work have been included in the textbooks. It is expected that these activities would help learner master communicative skills. Ultimately, it is expected that students master the art of learning to learn and make use of these competencies in real life.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks. A few works of some writers and poets have been included in these textbooks. The textbook society is extremely grateful to them for giving their consent for the inclusion of these pieces in the textbooks.

©KTBS Not to be republished

**Prof G. S. Mudambadithaya**
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bangalore, Karnataka

**Y. T. Gurumurthy**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bangalore, Karnataka

# हितगुज

मित्र हो,

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक बालकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पद्धतीचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनाप्रमाणे विशिष्ट टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करून वेळोवेळी विधायक बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन 1986 मध्ये 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' स्वीकारून शिक्षण पद्धतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. 1998 पासून संपूर्ण देशभर 'सामर्थ्यावर आधारित शिक्षण' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करून देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनीनी स्वीकारली आहे असे दिसून आले.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वतःच्या राहणीमान, आचार विचारात बदल करत असतो. शिक्षणक्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नव विचार घेऊन पुढे जाणे, हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीय पातळीवर या नवविचारांचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुष्टिकर असेल अशी आशा मनी बाळगून 2005 मध्ये 'अभ्यासक्रमाची राष्ट्रीय चौकट' तयार करण्यात आली. एन.सी.इ.आर.टी मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला, 'एन.सी.एफ. 2005' असे संबोधण्यात आले आहे. एन.सी.एफ. 2005 बाबत विस्ताराने शिक्षक मार्गदर्शिकेत माहिती दिलेली आहेच, तथापि या 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क 2005' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना पाठ्य पुस्तक मंडळाला असा ठाम विश्वास वाटतो की मंडळ 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहे.

सत्य आणि अहिंसेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणाऱ्या भगवान गौतम बुद्धांच्या या देशात महात्मा गांधीजीनी हा संदेश सर्वदूर पोचविला. आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी या सारख्या गांधीवादी नेत्यांनी सत्य अहिंसेच्या विचारांची जोपासना केली.

सत्य अहिंसेच्या तत्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारून 'चलेजाव'चा नारा द्यावा लागला. स्वातंत्र्यासाठी 'करो या

©KTBS Not to be republished

मरो' ही घोषणा द्यावी लागली... म्हणजेच कणखर व्हावे लागले हे ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही.

'एन.सी.एफ. 2005' मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभावान भारताच्या उभारणीचे बीजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषतः समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय 'भारतीय शिक्षणाने' उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश पूज्य साने गुरुजींच्या शब्दात सांगायचा तर ''बल सागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो!''

या राष्ट्रीय ध्येयाप्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमी, शिक्षक बंधू-भगिनी व पालक बंधू-भगिनींच्या विधायक सूचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे. निर्देशनालयाच्या आदेशाप्रमाणे पुस्तक रचना समितीची यादी इंग्रजीमध्ये दिलेली आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीमध्ये श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल, बेळगावचे मुख्याध्यापक श्री. एम.के. मादार यानी कार्यशाळांकरिता सभागृह आणि ग्रंथालय उपलब्ध करून दिले.

'बाल भारती' पुणे येथील मराठी विषयाचे विशेष अधिकारी प्रा. माधव राजगुरू यांनी पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यात वेळोवेळी अमूल्य सल्ला दिला. लेखक व कवी यांची अनुमती मिळवून देण्याबाबत सहकार्य केले.

पाठ्यपुस्तक मंडळ या सर्वांचे आभारी आहे.



**पाठ्यपुस्तक मंडळ**

©KTBS Not to be republished

# TEXT BOOK COMMITTEE

## CHAIRMAN

**Shri. Madhav Kunte,** Ushatai Gogte Girls' High School, Belagavi.

## MEMBERS

**Shri. P.K. Muchandikar,** C.R.P. - Belgundi, Tal. & Dist. : Belagavi.

**Shri. A.V. Desai,** Rtd. H.M. Yellur, Tal. & Dist. : Belagavi.

**Smt. Sangeeta Deshpande,** Vaikunth Shanbhag High School, Bhagya Nagar, Tilakwadi, Belagavi.

**Shri. Tukaram More,** Shivaji Hr. Pry. Marathi School, Shahunagar, Ganj-Bhalki, Dist. Bidar.

## ARTIST

**Shri. Vasant Sali,** Art Master, Govt. High School, Sangreshkoppa, Tal. Soudatti, Dist. Belagavi.

## SCRUTINIZER

**Smt. Vidya Deshpande,** Thalakwadi High School, Tilakwadi, Belagavi.

## CHIEF CO-ORDINATOR

**Prof. G.S. Mudambadithaya,** Curriculum revision and text book preparation, K.T.B.S. Bengaluru.

## CHIEF ADVISERS

**Sri. Narasimaiah,** Managing Director, KTBS, Bengaluru.

**Sri. C. Nagamani,** Deputy Director, KTBS, Bengaluru.

## PROGRAMME CO-ORDINATOR

**Smt. Asharani. N.** Assistant Director, KTBS, Bengaluru.

©KTBS Not to be republished

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರಿಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

©KTBS Not to be republished

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

**(ನರಸಿಂಹಯ್ಯ)**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

**(ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ)**
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

©KTBS Not to be republished

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

## ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

### ಅಧ್ಯಕ್ಷರು

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

### ಸದಸ್ಯರು

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ, ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್. ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

### ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:

**ಶ್ರೀ ನರಸಿಂಹಯ್ಯ** : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

**ಶ್ರೀಮತಿ ಸಿ. ನಾಗಮಣಿ** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

### ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:

**ಶ್ರೀಮತಿ ಆಶಾರಾಣಿ. ಎನ್.** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು-85.

©KTBS Not to be republished



# अनुक्रमणिका


| अ.नं. | पाठ | | लेखक/कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | झेंडा आमुचा | (कविता) | कवी- वि.म. कुलकर्णी | 1 |
| 2. | नेताजी सुभाषचंद्र बोस | | | 5 |
| 3. | आई मला पावसात जाऊ दे | (कविता) | कवयित्री- वंदना विटणकर | 8 |
| 4. | घरचा वैद्य | | | 12 |
| 5. | खेळ लगोरीचा | | | 18 |
| 6. | आवडती मज | (कविता) | कवी - गोविंद केळकर | 23 |
| 7. | पिंजऱ्यातील सुंदर पक्षी | | | 29 |
| 8. | फुलपाखरा | (कविता) | कवी - सुधांशू | 34 |
| 9. | रस्ता पार करताना | | | 37 |
| 10. | रेल गाडी | (कविता) | कवी - कुसुमाग्रज | 41 |
| 11. | पिंकीची भेटवस्तू | | | 46 |
| 12. | दासवाणी | (कविता) | कवी - समर्थ रामदास | 51 |
| 13. | प्रामाणिकतेचे फळ | | | 54 |
| 14. | चतुर इसाप | | | 59 |
| 15. | झोका | (कविता) | कवी - हेमंत मुश्रीफ | 63 |
| 16. | धाडसी दयानंद | | | 67 |
| 17. | चांगल्या सवयी | | | 73 |
| 18. | संतवाणी | (कविता) | कवी - संत तुकाराम | 78 |


©KTBS Not to be republished

# शाळा आरंभ दिवस



# पाठ - १

# झेंडा आमुचा

झेंडा आमुचा प्रिय देशाचा
फडकत वरी महान
करितो आम्ही प्रणाम याला
करितो आम्ही प्रणाम ॥धृ॥

लढले गांधी याच्याकरिता
टिळक, नेहरू लढली जनता
समर धुरंधर वीर खरोखर
अर्पुनी गेले प्राण ॥१॥

भारतमाता आमुची माता
आम्ही गातो या जयगीता
हिमालयाच्या उंच शिरावर
फडकत राही निशाण ॥२॥

**- वि.म. कुलकर्णी**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ

प्रणाम - नमस्कार
महान - मोठा
निशाण - झेंडा
समर - युद्ध
जनता - लोक
नाद - आवाज
सागर - समुद्र
गगन - आकाश
हिमालयाच्या शिरावर - हिमालयाच्या शिखरावर

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.**

१. झेंड्यासाठी कोणकोण लढले?
२. आपण स्वातंत्र्य दिन केव्हा साजरा करतो?
३. आमच्या झेंड्यातील तीन रंग कोणते?
४. तिरंगा झेंडा कोठे फडकत आहे?

**आ. कवितेत ज्यांची नावे आलेली नाहीत अशा स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढलेल्या वीरांची आणखी चार नावे शिक्षकांच्या मदतीने लिही.**

**इ. लिही.**

| शब्द | समानार्थी शब्द | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|---|
| वीर | | |
| मोठा | | |
| प्रिय | | |

©KTBS Not to be republished

C M Y K

## ई. कवितेच्या ओळी पूर्ण कर.

लढले गांधी याच्याकरिता

.............................

.............................

अर्पुनी गेले प्राण

## उ. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भर.

१. हिमालयाच्या शिरावर ........... फडकतो (तिरंगा, पतंग, पताका)

२. भारत माझा ........... आहे. (राज्य, देश, गाव)

३. आम्ही रोज भारत मातेसाठी ........... गातो (आरती, कविता, जयगीत)

## ऊ. जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. २६ जानेवारी | अ. शिक्षकदिन |
| २. २ ऑक्टोबर | ब. बालदिन |
| ३. १४ नोव्हेंबर | क. गांधी जयंती |
| ४. ५ सप्टेंबर | ड. गणराज्य दिन |

## ए. तुला आवडलेल्या एका कडव्याचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.

## ऐ. या कवितेत शेवटी 'ता' हे अक्षर येणारे शब्द ओळखून लिही.

**जसे -माता**

१)     २)     ३)     ४)

©KTBS Not to be republished

ओ. ही कविता सामूहिकरीत्या साभिनय म्हणा.

झेंड्यामध्ये रंग भर.



❖❖❖



©KTBS Not to be republished



## पाठ - २

# नेताजी सुभाषचंद्र बोस

२३ जानेवारी १८९७ हा दिवस भारतमातेच्या एका पराक्रमी पुत्राचा जन्मदिवस. यांचा जन्म ओरीसा राज्यातील कटक येथे झाला. यांच्या आईचे नाव प्रभादेवी व वडिलांचे नाव जानकीनाथ होय. नेताजी सुभाषचंद्र बोस हे या थोर नेत्याचे नाव. भारताच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे सर्वस्व अर्पण करून नेताजी अमर झाले.

नेताजींचे हे थोरपण अनेकांनी लहानपणीच जाणले होते. कारण ते अगदी बालवयात तुमच्या सारखे असतानाच असे काही प्रसंग घडले, की सुभाष हा सामान्य मुलगा नाही हे अनेकांना कळून आले.

वयाच्या पाचव्या वर्षी एका घटनेने सुभाषचा स्वाभिमान आणि धैर्य याचे दर्शन त्याच्या मित्रांना व इतरांना घडले. तो त्यावेळी प्रोटेस्टंट युरोपियन स्कूलमध्ये जात



Not to be republished ©KTBS

होता. शाळेत इंग्रजांचीही अनेक मुले येत असत. ती भारतीय मुलांना शिव्या देत, मारत, चेष्टा करत. एके दिवशी मैदानावर इंग्रज मुले खेळत होती. भारतीय मुले एका झाडाखाली बसली होती. सुभाष तेथे गेला व म्हणाला, ''अरे, तुम्हाला खेळायचे नाही का?'' ती मुले म्हणाली, ''हो, खेळायचे आहे ना! पण ती इंग्रज मुले खूप दुष्ट आहेत. ती खेळू देत नाहीत, मारतात,'' पटकन सुभाष म्हणाला, ''मग तुम्हाला काय हात नाहीत? तुम्ही काय शेणामातीचे आहात? चला काढा चेंडू.''

सारी मुले थोडी बिचकलीच. पण सुभाषने पुढाकार घेताच खेळू लागली. इंग्रज मुलांनी त्यांना अडविले. दोन्ही गटात चांगलेच भांडण झाले. भारतीय मुलांनी त्यांना चांगलेच चोपून काढले. सुभाष आणि त्याचे मित्र निर्भयपणे रोज खेळू लागले. सुभाषच्या मित्रांना खूप आनंद झाला.

Not to be republished ©KTBS

**नवीन शब्दांचे अर्थ -**

सर्वस्व - सर्व काही
अर्पण करणे - देणे
धैर्य - धाडस
दुष्ट - वाईट प्रवृत्तीचा
बिचकणे - दचकणे
पक्ष - गट , निर्भय - न घाबरता

## अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. सुभाषचंद्र बोस यांचा जन्म केव्हा झाला?
२. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी काय अर्पण केले?
३. सुभाषचंद्र बोस कोणत्या शाळेत जात होते?
४. भारतीय मुले झाडाखाली का बसली होती?
५. वरील घटनेनंतर सारी भारतीय मुले कशी खेळू लागली?

CMYK

## आ. रिकाम्या जागा भर.

१. सुभाषचंद्रांच्या आईचे नाव ................. होय.

२. जानकीनाथ हे सुभाषचंद्रांचे ................. होय.

३. ................. येथे सुभाषचंद्रांचा जन्म झाला.

४. सुभाषचंद्रांचा जन्मदिवस ................. रोजी साजरा करतात.

## इ. शब्दातील फरक शिक्षकांकडून जाणून घे.

दिन - दीन

सुत - सूत

खून - खूण

गृह - ग्रह

## ई. शिक्षकांच्या मदतीने नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :- सुभाषचंद्र बोस - नेताजी

१. वल्लभ भाई पटेल ..........

२. जवाहरलाल नेहरू ..........

३. बाळ गंगाधर टिळक ..........

४. मोहनदास करमचंद गांधी ..........

## उ. खालील वाक्ये वाच व लिही.

१. प्रत्येकाने शरीर स्वास्थ राखावे.

२. देशाबद्दल स्वाभिमान असावा.

३. देशसेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा होय.

४. मातृभूमी ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे.

## ऊ. तुला माहीत असलेल्या नेत्यांच्या चित्रांचा संग्रह कर.

❖❖❖

©KTBS Not to be republished

## पाठ - ३

# आई मला पावसात जाऊ दे



आई, मला पावसात जाऊ दे
एकदाच ग भिजुनी मला चिंब चिंब होऊ दे ।।धृ।।
मेघ कसे हे गडगड करिती
विजा नभातून मला खुणविती
त्यांच्यासंगे अंगणात मज खूप खूप नाचू दे ।।१।।
खिडकीखाली तळे साचले
गुडघ्याइतके पाणी भरले
तऱ्हेतऱ्हेच्या होड्यांची मज शर्यत ग, लावू दे ।।२।।
बदकांचा बघ थवा नाचतो
बेडूकदादा हाक मारतो
पाण्यामधुनी त्यांचा मजला पाठलाग करू दे ।।३।।
धारे खाली उभा राहुनी
पायाने मी उडविन पाणी
ताप, खोकला, शिंका, सर्दी वाटेल ते होऊ दे ।।४।।

**- वंदना विटणकर**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ :-

मेघ -ढग
नभ - आकाश
खुणविणे - खुणा करणे, बोलावणे
तऱ्हेतऱ्हेच्या - वेगवेगळ्या

# अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. पाऊस कोणकोणत्या महिन्यात पडतो?
२. मुलाला पावसात कसे भिजायचे आहे?
३. पाऊस पडल्यानंतर काय झाले?
४. पावसात कवितेतील मुले कोण कोणते खेळ खेळतात ?
५. मुलांना पावसाच्या पाण्यामधून कुणाचा पाठलाग करावासा वाटतो?
६. कवितेतील मुलास पावसात जाण्यापासून आई का अडवीत असेल असे तुम्हास वाटते?

### आ. खालील ओळी पूर्ण कर.

१. मेघ कसे हे ................
विजा नभातुन ................
२. खिडकी खाली ................
गुडघ्या इतके ................
३. बदकांचा बघ ................
बेडूकदादा ................
४. धारेखाली ................
पायाने मी ................

Not to be republished ©KTBS

CMYK

**इ. तुमच्या नात्यातील व्यक्तींची नावे लिही.**

१. बाबा - ______________________

२. आई - ______________________

३. ताई - ______________________

४. दादा - ______________________

५. आजोबा - ______________________

६. आजी - ______________________

**ई. प्राणी/पक्ष्यांचे नाव व त्यांचे आवाज त्यांच्या जोड्या जुळव.**

(कूजन, भुंकणे, किलबिल, डरकाळी, चिवचिव, गर्जना, गुणगुण, हंबरणे)

उदा. - कोंबड्याचे - आरवणे

१. कोकिळेचे - ________________

२. गायीचे - ________________

३. सिंहाची - ________________

४. चिमणीची - ________________

५. कुत्र्याचे - ________________

६. पक्ष्यांची - ________________

७. वाघाची - ________________

८. डासांची - ________________

**उ. तुझ्या आईबद्दल तुला काय वाटते? तुझ्या शब्दात सांग.**

**ऊ. कवितेस चाल लावून ती तोंडपाठ कर.**

©KTBS Not to be republished

## ए. अक्षरे योग्य क्रमाने जुळवून शब्द लिही.

नमुना - ड ग ड ब - गडबड

१. णा अं त ग ________________

२. दा बे क डू दा ________________

३. ग पा ला ठ ________________

४. भा न तू न ________________

५. त दि मं रा ________________

## ऐ. खालील वाक्ये वाच व लिही.

१. आईसारखे दैवत नाही.

२. गुरुजनांचा आदर करावा.

३. पाण्याचा वापर जपून करावा.

४. झाडे लावा, झाडे वाचवा.



©KTBS Not to be republished

# पाठ - ४

# घरचा वैद्य



प्रेम आणि प्रतीक्षा सुट्टीत आजोळी गेली होती. त्याच वेळी दिव्या, अंकुर ही मामांची मुलेही आली होती.



सकाळी उठल्यानंतर प्रेम बागेत गेला. बागेत आजोबा फेरफटका मारत होते. बागेतील रोपांना लक्षपूर्वक, प्रेमाने पहात होते. पाणी घालत होते.

प्रेमच्या पाठोपाठ इतर मुलेही बागेत आली. आजोबाप्रमाणे सर्वजण बागेतील रोपांना पाहू लागली. बागेत तुळस, दुर्वा,

©KTBS Not to be republished

सब्जा, गवती चहा, अडुळसा, ओवा, बडिशेप, कोरफड, आले अशा वनस्पती होत्या. त्याचप्रमाणे कडुलिंब, बेलाचे झाड, आंबा, डाळिंब, पेरू अशी झाडेही होती. झाडावर पक्ष्यांचा किलकिलाट चालू होता.



प्रतीक्षा : ''आजोबा ही कसली वेगळीच रोपे लावलीत तुम्ही!''

आजोबा : ''अगं, ही सर्व बाग म्हणजे घरचा वैद्य आहे!''

अंकुर : ''काय हो आजोबा! बाग आणि वैद्य काहीतरी बोलू नका.''

आजोबा : ''अरे मुलांनो, या वनस्पती आपल्याला साध्या साध्या आजारात फार उपयोगी पडतात. औषध म्हणून यांचा आपण उपयोग करू शकतो.''

दिव्या : ''म्हणजे कसा हो आजोबा?''

आजोबा : ''एखाद्या वेळी आपले पोट दुखू लागले तर ओव्याची पाने खाल्यास पोट दुखणे थांबते.''

©KTBS Not to be republished

प्रतीक्षा : ‘‘आजोबा, आपण तुळशीची रोपे लावतो, त्याचा काय उपयोग?’’

आजोबा : ‘‘तुळशीच्या रोपामुळे हवा स्वच्छ राहते. खोकल्यावर तुळशीची पाने गुणकारी आहेत. त्याच्या पानांचा रस घेतल्याने खोकला बरा होतो. शिवाय तुळशीमुळे परिसरातले डास कमी होतात.’’



प्रेम : ‘‘पण आजोबा, मला डॉक्टरांनी एकदा खोकल्यावर आडुळसा हे औषध दिले होते.

आजोबा : ‘‘अगदी बरोबर! आडुळशाच्या पानांचा रस साखर किंवा गूळ घालून प्यायल्याने खोकला गेलाच समजा.’’



दिव्या : ‘‘आजोबा, माझ्या मैत्रिणीला सारखी सर्दी होते. त्यासाठी कोणती वनस्पती उपयोगी आहे?’’

आजोबा : ‘‘अगं, तिला सांग गवती चहाचा पाला घालून चहा कर व पी, मग बघ, सर्दी कशी कमी होते ती!’’

मुले : आजोबा आता आमच्या शाळेतील बागेत टिचरांना सांगून अशा वनस्पती लावू. तेव्हा आमच्या शाळेतही कायमचे वैद्य असतील!



©KTBS Not to be republished

आजोबा : अरे वा! खूप चांगली मुले आहात तुम्ही. अशीच झाडे लावा. निसर्गावर प्रेम करा. पशुपक्ष्यांवर प्रेम करा. थोरा-मोठ्यांचा मान राखा. वनराईशी मैत्री करून, पर्यावरणाचे रक्षण करा.

## नवीन शब्दांचे अर्थ -

आजोळ - मामाचे गाव

निसर्ग - आजूबाजूचा परिसर

वनराई - जंगलातील झाडी

पर्यावरण - परिसरातील सर्व घटकांचे एकमेकांशी असणारे नाते व अवलंबत्व

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१. दिव्या व अंकुर कोठे आली होती?

२. बागेत फेरफटका कोण मारत होते?

३. झाडावर पक्षी काय करत होते?

४. कोणत्या रोपामुळे डास कमी होतात?

५. निसर्ग म्हणजे काय?

### आ. खालील आजारावरील औषधी वनस्पती औषधांच्या जोड्या लाव.

| | |
|---|---|
| १. सर्दी | १. आडुळसा |
| २. खोकला | २. कडुलिंब |
| ३. पोटदुखी | ३. गवती चहा |
| ४. पित्त | ४. ओवा |
| ५. त्वचाविकार | ५. आले |

©KTBS Not to be republished

## इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिही.

१. बागेत कोणकोणती झाडे होती?
२. तुळशीच्या रोपाचा कसा उपयोग होतो?
३. आजोबांच्या बागेतील औषधी वनस्पतींची नावे लिही.
४. बागेला घरचा वैद्य का म्हटले आहे?
५. पर्यावरणाचे रक्षण कसे करावे?

## ई. खालील वर्तुळात वनस्पतींची नावे दिलेली आहेत

उदा. दाखविल्याप्रमाणे त्यांचे वर्गीकरण कर.




| | वेल | रोप | झाड |
|---|---|---|---|
| उदा. | दोडका | भात | नारळ |
| | | | |
| | | | |
| | | | |

©KTBS Not to be republished

CMYK

### उ. उदा. दर्शविल्याप्रमाणे लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जसे | → | पळणे | पळा | पळतात |
| | | ओरडणे | ______ | ______ |
| | | बसणे | ______ | ______ |
| | | बघणे | ______ | ______ |
| | | झोपणे | ______ | ______ |
| | | वाचणे | ______ | ______ |

### ऊ. खालील शब्द योग्य क्रमाने लिही.

पान, फांदी, फूल, रोप, बीज, अंकुर, फळ

### ए. वेगवेगळ्या वनस्पतींची पाने गोळा कर. वहीत चिकटव व त्या वनस्पतीचे नाव लिही.

❖❖❖



©KTBS
be republished

पाठ - ५




# खेळ लगोरीचा



दुपारच्या जेवणानंतर थोडी सुस्ती आली होती. ताईंचा गायनाचा तास झाला. ताईंनी आपल्या गोड आवाजात प्रार्थना शिकविली. यानंतर एक मजेदार असे 'ससा तो कसा' हे गाणे शिकविले. आम्ही सर्वांनी सशासारख्या उड्या मारून-मारून गाणे म्हटले. पण सर्वांना खेळाच्या तासाचीच आतुरता लागली होती. एवढ्यात घंटा झाली आणि सर्वांच्या मुखातून एकच वाक्य बाहेर पडले. ''खेळाचा तास, हुर्रे ऽ ऽ.'' सर्व मुले पळतच मैदानावर गेली. पाहतात तर काय आमचे खेळाचे सर मैदानावर नव्हते. आमचे चेहरे हिरमुसले झाले. पण ताई म्हणाल्या, ''उदास होऊ नका. मी घेते खेळाचा तास.'' ते ऐकताच सर्वांनी आनंदाने उड्या मारल्या.

©KTBS Not to be republished

ताईनी सर्वांना रांगेत उभे केले. सर्वांना त्यांनी विचारले, ''आज तुम्ही कोणता खेळ खेळणार?'' सर्व मुलांनी आपापली मते मांडली. क्रिकेट, लंगडी, दोरीवरच्या उड्या, खो-खो, लगोरी, साखळीचा खेळ अशा अनेक खेळांची नावे सांगितली. ताई म्हणाल्या, ''चला आज आपण लगोरीचा खेळ खेळूया.'' मुले म्हणाली, ''आम्ही एकीकडे व मुली एकीकडे असे गट करूया.'' ताईनी सर्वांना न भांडता, न चिडता खेळ खेळण्याबद्दल सूचना केली.

वर्गात जाऊन सर्वेशने  आणला. सादिकने  आणल्या. जॉन, हिना, महेश, श्रेयस, ऋतुजा, सतीश, ओमकार, प्रणाली, राधा, अर्पिता, अफरोज, मेरी आणि आम्ही सर्वांनी मिळून दोन गट केले. एका बाजूला  उभी राहिली व एका बाजूला  उभ्या राहिल्या. अर्पिताने  जिंकला. आणि आधी  पाडविण्याचा निर्णय घेतला.  रबरी होता. त्यामुळे कसलीच भीती नव्हती. सुरुवातीला हिनाने  फेकला. तिचा नेम चुकला  तशीच राहिली. दुसऱ्यांदा प्रणालीने  फेकला.  च्या  विखुरल्या. ऋतुजाने पळत जाऊन लगेचच  ठेवण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच जॉनने अफरोजवर नेम धरून  मारण्याचा प्रयत्न केला. पण त्याने तो चुकविला.  दूर गेला व  कडे जाऊन पडला. ओमकार व सतीश  आणण्यासाठी पळाले. परंतु  टप्पा खाऊन  त जाऊन पडला. तोपर्यंत प्रणाली व मेरीने  एकावर एक ठेवून 'हुर्रे ऽऽ लगो ऽऽ री' अशी आरोळी मारली. असे चार वेळा झाले. त्यामध्ये मुलींनी तीन डाव जिंकले. मुलांनी मात्र एक डाव जिंकला.

शेवटी मुलींनीच लगोरीचा खेळ जिंकला. एवढ्यात घंटा झाली. सर्व मुले वर्गात आली. ताईनी आम्हा सर्वांना या खेळाचे महत्व विचारले. या खेळामध्ये पळणे, उड्या मारणे, नेम धरणे, चपळता, एकाग्रता अशा प्रकारची कौशल्ये साधता येतात. भरपूर व्यायाम होतो. व आपले मनोरंजनही होते.

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ -

आतुरता - अतिशय उत्सुकता

सुस्ती - आळस

कौशल्य - कुशलता

एकाग्रता - लक्षपूर्वक

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. सर्वांना कोणती आतुरता लागली होती?

२. मुलांनी किती गट केले?

३. नेम कुणाचा चुकला?


४. या खेळातून कोणती कौशल्ये साधता येतात?

५. ताईने मुलांना कोणते गाणे शिकविले?

### आ. खालील साहित्यांची नावे लिही.







### इ. गटात न जुळणाऱ्या शब्दाला गोल कर.

१. चेंडू, बॅट, विटी, स्टंप

२. विटी, दांडू, बॅट, लगोरी

३. कॅरम, सोंगट्या, पत्ते, फुटबॉल

४. खुर्ची, पुस्तक, वही, पट्टी

५. पतंग, दोरी, मांजा, परती

Not to be republished ©KTBS

## ई. खालील चौकटीत खेळांची नावे लपली आहेत. ती शोध व लिही.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ल | पं | डा | व | स | प | क्रि | के | ट | व्हॉ |
| गो | ळा | फे | क | ब | ड्डी | र | क | म | ली |
| री | त | ळ्या | त | म | ळ्या | त | ब | व | बॉ |
| खो | लं | ग | डी | त | बा | स्के | ट | बॉ | ल |
| खो | स्क | क्य | मी | टी | म्य | च | ठ | गो | क |

## उ. खालील खेळ कोठे खेळतात तेथे ✓ खूण कर

| खेळ | घरात | मैदानात |
|---|---|---|
| क्रिकेट | | |
| खो-खो | | |
| कॅरम | | |
| पतंग उडविणे | | |
| विटी-दांडू | | |
| सापशिडी | | |
| व्हॉलीबॉल | | |
| हॉकी | | |
| फुटबॉल | | |
| कराटे | | |

©KTBS Not to be republished

C M Y K

## ऊ. दोन गटांनी मिळून खेळता येणारे खेळ लिही.

१. ______________

२. ______________

३. ______________

४. ______________

५. ______________

## ए. नमुन्या प्रमाणे लिही.

उदा. भित्रा - धीट


१. आनंद - ______________

२. दिवस - ______________

३. जिंकणे - ______________

४. गोड - ______________

©KTBS Not to be republished




वरील चित्र कोणत्या इयत्तेच्या पुस्तकात आहे ते शोध ती कविता वाच.

## पाठ - ६

# आवडती मज



आवडतो मज पोपट हिरवा
लाल लाल चोचीचा
फराळ त्याचा मिरची पेरू
पिकल्या डाळिंबाचा



इकडुन तिकडे झाडावरती
सरसर पळते खार
करत वाकुल्या मला हसविते
शेपुट गोंडेदार



इवलीशी ही चिमणीताई
चिवचिव गाणे म्हणते
दाणे टिपुनी भुरकन् उडते
तारेवरती झुलते.



मोत्या अमुचा सदा भुंकतो
आगे मागे पळतो
खरा इमानी आहे प्राणी
राखण घरची करतो.

©KTBS Not to be republished

C M Y K



ऐटदार चालतो कोंबडा
डोईवरती तुरा
आरवूनी मज जागे करतो
मित्र जिवाचा खरा



शिंगे सुंदर रंग काळा
अमुची कपिला गाय
आजी म्हणते ही तर आहे
सर्व जगाची माय

आवडती हे मजला सारे
त्यांची गट्टी पक्की
आणि सुट्टीच्या दिवशी खेळू
मिळून सारे नक्की

**- गोविंद केळकर**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ

वाकुल्या दाखविणे - चिडविणे.
झुलणे - डोलणे
इमानी - प्रामाणिक
ऐटदार - डौलदार
माय - आई
गट्टी - मैत्री
आरवणे - कोंबड्याचे ओरडणे.

CMYK

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. कवितेतील प्राणी व पक्षी यांची नावे लिही.

२. पोपटाला फराळ करण्यासाठी काय काय लागते?

३. मोत्याचे कौतुक कसे केले आहे?

४. आरवून जागे कोण करतो?

५. गायीला आजी काय म्हणते?

## आ. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.

१. आवडतो मज पोपट हिरवा

______________________

२. मोत्या अमुचा सदा भुंकतो

______________________

३. इकडून तिकडे झाडावरती

______________________

४. ऐटदार चालतो कोंबडा

______________________


५. शिंगे सुंदर रंग काळा

______________________

©KTBS Not to be republished

C M Y K

## इ. शब्द बनव. लिही व वाच.




1. ______________
2. ______________
3. ______________
4. ______________
5. ______________
6. ______________

## ई. तक्ता भर.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकवचन | पोपट | ______ | चिमणी | ______ | कोंबडा | ______ | शिंक | ______ |
| अनेकवचन | ______ | खारी | ______ | कुत्री | ______ | गायी | ______ | शेपट्या |

## उ. खालील शब्द वाच व लिही.

पट्टी ______ चक्की ______ रद्दी ______ भट्टी ______ हट्टी ______

## ऊ. कवितेतील लयबद्ध शब्द शोध व लिही.

१. ______________

२. ______________

३. ______________

४. ______________

©KTBS Not to be republished

## ए. कल्पना कर. तू काय करणार? ते एका वाक्यात लिही.

१. पोपट होऊन ____________________

२. खार होऊन ____________________

३. चिमणी होऊन ____________________

४. मोत्या होऊन ____________________

५. कोंबडा होऊन ____________________

## ऐ. कविता पाठ कर व अभिनयासह म्हण.

## ओ. नमुन्याप्रमाणे लिही. नमूना :- मुलगा-मुलगी

१. कोंबडा ____________ ५. मोर ____________

२. कुत्रा ____________ ६. वाघ ____________

३. गाय ____________ ७. कावळा ____________

४. चिमणी ____________ ८. घोडा ____________

## औ. प्राणी आणि घरे यांच्या जोड्या जुळव.

| | |
|---|---|
| १. कोंबडी | १. घरटे |
| २. साप | २. गुहा |
| ३. गाय | ३. खुराडे |
| ४. चिमणी | ४. वारूळ |
| ५. सिंह | ५. गोठा |

©KTBS
Not to be republished

## अं. कवितेतील चित्रे पुन्हा बघ आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

१. ऐटदार कोण चालतो?

२. गोंडेदार शेपूट कोणाची आहे?

३. खरा इमानी प्राणी कोण आहे?

४. सुट्टीच्या दिवशी कोणा कोणा बरोबर खेळायचे आहे?

## अः. तुला आवडणाऱ्या रंगांची नावे लिही.



❖❖❖

© KTBS Not to be republished

## पाठ - ७

# पिंजऱ्यातील सुंदर पक्षी

रंजना इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकत होती. त्यांची उद्या सकाळी प्राणि-संग्रहालयाला सहल जाणार होती. त्यामुळे ती आज फारच आनंदी होती. सहलीला काय काय न्यायचं याचा विचार करण्यात ती अगदी दंग होती. सकाळ केव्हा होते, व आपण सहलीला केव्हा जातो असं तिला झालं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी, एकदाची शाळेतून बस निघाली. प्राणिसंग्रहालयाला पोहोचली. आत शिरताच प्राणिसंग्रहालयात प्राण्यांबरोबर अनेक प्रकारचे, अनेक रंगांचे अनेक पक्षीही तिला बघायला मिळाले. प्रत्येकांचा रंग, आकार, पंख, चोच वेगवेगळेच होते. सर्व मुलांनी या सहलीत खूप मजा केली. मौज लुटली. संध्याकाळी बस परत शाळेसमोर आली. प्रत्येकजण अगदी आनंदी वातावरणात आपापल्या घरी गेले. रंजना मात्र त्या विविधरंगी पक्ष्यांच्या विचारातच गुंग होती.




रंजनालाही वाटू लागलं की आपणही घरी असे रंगीत पक्षी पाळावेत. तिने आपल्या बाबाजवळ हट्ट धरला. बाबांनी तिला खूप समजावले, ''अशा पक्ष्यांना छोट्या पिंजऱ्यात कोंडून ठेवू नये. त्याना मोकळ्या वातावरणात उंचच उंच उडू द्यावं.'' पण कुठलं काय! तिला काही केल्या ते पटेना. शेवटी हार पत्करून बाबांनी एक छोटा पिंजरा व रंगीबेरंगी छोटे छोटे पक्षी आणून दिले. लगेच रंजना खूष झाली. तो पिंजरा

©KTBS Not to be republished

C M Y K

तिने सर्वांच्या नजरेस पडेल अशा ठिकाणी लावला. तिने ही आनंदाची बातमी आपल्या सर्व वर्गमैत्रिणींना सांगितली. मैत्रिणींना घरी बोलवायचं व ते पक्षी दाखवून खेळत बसायचे, असा तिचा रोजचा कार्यक्रम.

एकदा शाळेतून येताना एक छोटासा अपघात झाला. तिच्या पायाला फ्रॅक्चर झाले. पायाला प्लॅस्टर घातले गेले. डॉक्टरांनी तिला वीस दिवस विश्रांतीचा सल्ला दिला. दोन चार दिवस गेले. रंजना घरात एकटीच बसून रहायची. तिला सारखी शाळेची, मैत्रिणींची आठवण येऊ लागली. घरासमोर इतर लहान मुले खेळत असणारी पाहून तिला खूप वाईट वाटू लागलं. काही काही वेळा तर रडू लागली. हळूहळू तिने खाणेपिणे कमी केले. तिचे मन कशातच रमेनासे झाले.



एके दिवशी दुपारी रंजनाचा डोळा लागला. ती गाढ झोपेत होती. तिच्या स्वप्नात पिंजऱ्यातला एक पक्षी आला व तिच्याशी बोलू लागला. ‘‘अगं, रंजना तुला डॉक्टरांनी वीस दिवस विश्रांती घेण्यास सांगितले तर तू इतकी धीर सोडतेस, दुःखी होतेस. मी तर तुझ्या घरी आयुष्यभर माझे सारे जग सोडून या पिंजऱ्यात राहणार आहे. तुला तुझे सर्व नातेवाईक तरी भेटतात. पण मला कोण भेटणार? तू रडतेस तेव्हा तुझे आई-वडील तुझे डोळे तरी पुसतात. पण माझे डोळे कोण पुसणार?’’

‘‘पिंजऱ्यात बसून बाहेर मनसोक्त उडणारे पक्षी पाहताना मला माझ्या आई-वडिलांची, मित्रमैत्रिणींची सारखी आठवण येते. त्यांच्यासारखे मला उडताच येणार

©KTBS Not to be republished

नाही. याचे मला दुःख होते. तू वीस दिवसांनी बाहेर जाशील, मित्र मैत्रिणींना भेटशील, तेव्हा तुला आनंद वाटेल, पण माझे काय?''



रंजनाला जाग आली. ती उठली. ती हळुवार त्या पक्ष्यांच्या पिंजऱ्याकडे गेली. पिंजऱ्याचं दार उघडलं व त्या पक्ष्यांना मुक्त केलं. मनात तिने विचार केला की पुन्हा कधी असे कोणत्या पक्ष्यांना कोंडून ठेवणार नाही. ते पक्षी आनंदाने आकाशात उंच भरारी घेऊन निघून गेले. रंजनाने बाबांची क्षमा मागितली व पुन्हा असे कधी करणार नाही असे वचन दिले.

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ -**

प्राणिसंग्रहालय - जेथे प्राण्याचा समूह ठेवला आहे असे ठिकाण

दंग होणे - गुंग होणे.

डोळा लागणे - झोप लागणे

मौज लुटणे - मजा करणे

मनसोक्त - मन मोकळे

विविधरंगी - वेगवेगळ्या रंगाचे

हार पत्करणे - पराभव मान्य करणे.

C M Y K

# अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.**

१. रंजना कोठे गेली होती?

२. रंजनाला काय वाटू लागले?

३. रंजनाने बाबाकडे काय मागितले?

४. पिंजऱ्यांतील पक्षी कसे होते?

५. रंजनाला किती दिवस विश्रांती घ्यावी लागली?

६. रंजनाला कोणाची आठवण येऊ लागली?

**आ. खालील प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे लिही.**

१. बाबांनी रंजनाला काय समजावले?

२. स्वप्नात पक्ष्याने सांगितलेले दोन विचार लिही.

३. रंजनाने बाबांची क्षमा केव्हा मागितली?

**इ. तुला आवडणाऱ्या पक्ष्यांची यादी कर.**

**ई. 'मी पाहिलेला पक्षी' यावर माहिती लिही.**

**उ. प्राण्यांची चित्रे जमव व चित्रसंग्रह तयार कर.**

**ऊ. जोड्या जुळव.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| गाय | घरटे |
| घोडा | जंगल |
| पक्षी | गुहा |
| वाघ | तबेला |
| हत्ती | गोठा |

©KTBS Not to be republished


C M Y K

## ए. खालील शब्दांच्या जोड्या जुळव.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खाणे | १. | चालणे |
| २. | येणे | २. | बसणे |
| ३. | रुसणे | ३. | बागडणे |
| ४. | उठणे | ४. | जाणे |
| ५. | बोलणे | ५. | फुगणे |
| ६. | नाचणे | ६. | पिणे |

## ऐ. नमुना दिल्याप्रमाणे लिही.

नमुना :- पाण्यातून




१. ____________

२. ____________

३. ____________

४. ____________

५. ____________

६. ____________

७. ____________

८. ____________

❖❖❖

©KTBS Not to be republished

# पाठ - ८

# फुलपाखरा



फुलपाखरा ये इकडे
छान गडे तू छान गडे
सुंदर सुंदर रंगांनी
रंगविले तुजला कोणी?

पंख कसे इवले इवले
उडसी पडसी त्याचमुळे
मऊ मऊ तव अंग किती
किती करसी गमती जमती!



खूप मला रे मित्र जरी
आवडसी तू खरोखरी
तुजसंगे धावायाला
मौज वाटते फार मला!





लपंडाव चल खेळूया
नाचूया रे बागडुया
फुलपाखरा ये इकडे
छान गडे तू छान गडे!



- सुधांशू

©KTBS Not to be republished

CMYK

## नवीन शब्दांचे अर्थ

इवले - लहान
तव - तुझे
तुजसंगे - तुझ्याबरोबर
मौज - मजा
लपंडाव - लपाछपीचा खेळ

# अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

१. कवितेतील कोणाला कोणता प्रश्न पडला आहे?
२. फुलपाखराचे अंग कसे आहे?
३. मुलीला कशामध्ये मौज वाटते?
४. मुलाला फुलपाखरांबरोबर कोणता खेळ खेळावासा वाटतो?
५. फुलपाखरु कशामुळे उडते?

### आ. खालील ओळी पूर्ण कर.

१. सुंदर सुंदर ................
रंगविले ................
२. मऊ मऊ ................
किती करसी ................
३. तुजसंगे ................
मौज वाटते ................
४. फुलपाखरा ................
छान गडे तू ................

### इ. तुला माहीत असलेल्या खेळांची नावे सांग.

©KTBS Not to be republished

## ई. नमुन्याप्रमाणे पुढील गाळलेल्या जागा भर.

१. मऊ मऊ ............ कापूस

२. निळे निळे ...............

३. गार गार ...............


४. झुळ झुळ ...............

## उ. खालील शब्दांच्या जोड्या जुळव व शब्द पुन्हा लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पिवळा | बुंद | पिवळा धमक |
| २. | काळा | शुभ्र | ______ |
| ३. | निळा | गार | ______ |
| ४. | लाल | भोर | ______ |
| ५. | हिरवा | धमक | ______ |
| ६. | पांढरा | शार | ______ |

## ऊ. ही कविता चालीत म्हण व पाठांतर कर.

## ए. ठिपके जोडून फुलपाखराचे चित्र काढून रंगव.



©KTBS Not to be republished

CMYK

# पाठ - ९

# रस्ता पार करताना



रोहित व त्याचे आजोबा एके दिवशी संध्याकाळी बाजारात निघाले होते. रोहित हा तिसऱ्या इयत्तेत शिकणारा मुलगा. बाजारात जायचे म्हणताच त्याला खूपच आनंद झाला. तो घाईघाईने आजोबांबरोबर जाण्यास तयार झाला. आजोबांचा हात धरून तो त्याना ओढतच रस्त्यावर वेडेवाकडे चालू लागला. मध्येच त्याने आजोबांचा हात सोडला व पळू लागला. इतक्यात समोरून एक सायकल आली व अपघात होता होता टळला. रोहित आजोबांकडे घाबरत आला, व आजोबांचा पुन्हा हात धरून चालू लागला. तेव्हा आजोबा रोहितला म्हणाले, ''रोहित रस्त्याने जाताना रहदारीचे काही नियम आहेत ते आपण पाळले पाहिजेत.'' रोहित म्हणाला, ''आजोबा सांगा ना ते नियम कोणते? मी पण पाळीन व इतरांना सांगेन.''

© Not to be republished

आजोबा म्हणाले, मी सांगतो ते ऐकत चल. रस्त्याने जाताना नेहमी डाव्या बाजूने जावे. रस्ता पार करत असताना नेहमी डाव्या व उजव्या बाजूला पाहून कोणतेही वाहन येत नसल्याची खात्री करून मगच रस्ता पार करावा. रस्ता पार करत असताना रस्त्यावर पिवळ्या व पांढऱ्या रंगाचे पट्टे मारलेले असतात तेथूनच जावे. याला झेब्रा क्रॉस म्हणतात. चालता चालता एक चौक आला. चौकात सिग्नल लागले होते. काही वाहने चालली होती, तर काही उभी होती. तेव्हा रोहितने आजोबांना विचारले, 'आजोबा हे रंगीबेरंगी दिवे का लागलेत?' तेव्हा आजोबा म्हणाले, शहरात मुख्य चौकात सिग्नल असतात. त्यावरील तीन रंगांच्या दिव्यांचे महत्व जाणूनच पुढे जावे किंवा रस्ता पार करावा. लाल दिवा लागला असता थांबावे. पुढे जाऊ नये. पिवळा दिवा लागला असता पुढे जाण्यासाठी तयार रहावे. हिरवा दिवा लागताच आपण पुढे जावे. बाळ रोहित, अजूनही बरेच नियम आहेत. पण तू जसजसा मोठा होशील तसे तुला कळेल.

तेव्हा रोहितलाही आनंद झाला. रोहित व आजोबा बाजारात जाऊन भाजी, फळे घेऊन आले. रोहित आनंदाने आपल्या आईला सांगू लागला, आई, आजोबानी मला की नाही रस्त्यावरून जाताना कसे जावे हे समजावले. तेव्हा आजीने रोहितला विचारले, लाल-पिवळ्या, हिरव्या रंगांच्या दिव्यांचे गुपित कळले ना बाळा तुला? रोहित अगदी खुशीत म्हणाला, हो आजी! मी ना यापुढे आजोबांनी सांगितलेल्या नियमाप्रमाणेच रस्त्याने जाईन.

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ

सिग्नल - रहदारी दर्शक दिवे.

खुशीत - आनंदात

चौक - जेथे चार रस्ते एकत्र येतात ती जागा.

## अभ्यास

### अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

१. रोहित व आजोबा कोठे निघाले होते?

२. रस्त्याने जाताना कोणत्या बाजूने जावे?

३. लाल दिवा काय सांगतो?

४. रोहित व आजोबांनी काय काय आणले?

५. रोहित कोणत्या इयत्तेत शिकत होता?

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. आजोबांनी रोहितला काय सांगितले?

२. झेब्रा क्रॉस कशाला म्हणतात?

३. कोणता दिवा लागताच पुढे जावे?

©KTBS Not to be republished

## इ. जोड्या जुळव.




पुढे चला

थांबा

तयार रहा

## ई. रहदारीच्या नियमांची चिन्हे व त्यांची माहिती शिक्षकांकडून समजून घे.



©KTBS Not to be republished

पाठ - १०

# रेल गाडी



धाड धाड खाड खाड
चाले माझी रेल गाडी
झपाट्याने मागे जाती
रानेवने खेडीपाडी!

वेग आता मंदावला
आला डोंगराचा घाट
शीळ घुमे पहाडात
शिरे बोगद्यात वाट!

काळोख हा चहूकडे
नका कोणी भिऊ पण
गाडी धावे धिटाईने
शांत रहा सारेजण!

सरे बोगद्याची वाट
गाडी उजेडात येई
दिसे दऱ्यातील पुन्हा
जंगलाची हिरवाई!

© KTBS Not to be republished

धपा धपा चाले गाडी
रेलतळ आता आला
सिग्नलचा लाल दिवा
हवे इथे थांबायला!

याच गावी जायचे ना?
गाडी लागे फलाटास
झाला नाही कोणास ना
प्रवासाचा काही त्रास

सावकाश उतरावे
नका करू घाई फार
पुन्हा भेटू केव्हा तरी
नमस्कार - नमस्कार!

**- कुसुमाग्रज**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ

झपाट्याने - वेगाने
मंदावणे - कमी होणे
पहाड - डोंगर
धिटाई - धाडस
रेलतळ - रेल्वे स्टेशन
शीळ - शिटी
बोगदा - डोंगर पोखरून तयार केलेला रस्ता

# अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. डोंगराचा घाट आल्यानंतर काय होते?

२. शीळ कुठे घुमते?

३. दऱ्यांमध्ये काय दिसते?

४. गाडीने केव्हा थांबायला हवे असे कवितेतील मुलगा/मुलगी म्हणते?

५. गाडीतून उतरताना कसे उतरावे?

**आ. (काळोख, वाट, पहाड, हळू, वन)**

**वरील कंसात दिलेल्या शब्दातून शोधून समानार्थी शब्द लिही.**

१. जंगल : ______________

२. मंद ______________

३. अंधार ______________

४. रस्ता ______________

५. डोंगर ______________

**इ. खाली एकात एक असे दोन चौकोन दिले आहेत. आतील चौकोनातील शब्द व त्याच्या बाहेरील चौकोनातील शब्द यापासून जोडशब्द तयार करून लिही.**

बाहेरील चौकोन: दार, वाडी, पाडी, वने, भेट, तळ

आतील चौकोन: खेडी, गाठ, रेल, राने, शेती, घर

जसे - रेलतळ

______________

______________

______________

______________

______________

Not to be republished ©KTBS

CMYK

**ई. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.**

१. झपाट्याने मागे जाती
______________________

२. ______________________
गाडी उजेडात येई

३. सिग्नलचा लाल दिवा
______________________

४. सावकाश उतरावे.
______________________

**उ. नमुन्याप्रमाणे लिही.**

उदा. डोंगर - डोंगरावर

१. घर ____________

२. झाड ____________

३. शेत ____________

४. फळ ____________



५. दार ____________

**ऊ. तू कोणत्या वाहनातून प्रवास करतोस त्यांची नावे सांग व लिही.**

**ए. कविता वाच. चालीत म्हण व तोंडपाठ कर.**

©KTBS Not to be republished

## ऐ. वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांची चित्रे व नावे यांच्या जोड्या जुळव.

| नाव | चित्रे |
|---|---|
| घोडा |  |
| बैलगाडी |  |
| उंट |  |
| याक |  |

©KTBS Not to be republished

## पाठ - ११

# पिंकीची भेटवस्तू




©KTBS Not to be republished

शनिवार असल्यामुळे पिंकी अर्ध्यादिवसाची शाळा संपवून घरी आली. पिंकीचे खरे नाव प्राजक्ता होते. पण घरात आणि शाळेतही, तिला सर्वजण लाडाने पिंकीच म्हणत असत. घरी आल्याबरोबर ती आईला म्हणाली, ''आई आज पूजाचा वाढदिवस आहे. संध्याकाळी मी तिच्याकडे जाणार आहे.'' आई म्हणाली, ''ठीक आहे, मी बाजारात जात आहे. तू मात्र जायच्या आधी अभ्यास पूर्ण कर. तुझ्या बरोबर तुझ्या मैत्रिणीपण येणार आहेत का?'' ''हो येणार आहेत. त्यांच्या बरोबर जाईन मी.'' असे म्हणून पिंकी जेवल्याबरोबर अभ्यासाला बसली. शाळेत दिलेला सर्व अभ्यास तिने पूर्ण केला.

अभ्यास झाल्यावर पिंकीने सर्व दप्तराची आवरा-आवर केली. पूजाच्या वाढदिवसाला जाण्याची तयारी करू लागली. अरेच्या! पूजाला काय भेट द्यायची? पैसे

C M Y K



मागावेत तर आई बाजारात गेलेली. तिच्याजवळ साठविलेले पैसे पाहिले तर तेही कमी होते. काय भेट द्यायची! म्हणून पिंकी विचार करू लागली. तिने स्वतः केलेल्या वस्तू पाहू लागली. निसर्गाचे सुंदर चित्र, गुलाबाचे कागदी फूल, भेटकार्ड, इत्यादी भेटवस्तू बघितल्या पण त्या न आवडल्यामुळे तिने जमा केलेल्या लग्नपत्रिका, ग्रिटिंग कार्ड, रंगीत नक्षी एकत्र केले. त्यातील सुंदर फुले, पक्षी, रंगीत नक्षी वगैरे कापून घेऊन कार्डशीटवर चिकटवून एक सुंदर भेटकार्ड तयार केले. त्याच्या बाजूने स्केचपेनने बॉर्डर आखली. आतील पानावर 'पूजास वाढदिवसाच्या शुभेच्छा' असे लिहिले. त्यावर चकमक चिकटवली. सुंदर असे भेटकार्ड तयार केले.

स्वतः तयार केलेले भेटकार्ड पाहून तिला खूप आनंद झाला. पिंकी आईवडिलांकडे कोणत्याही वस्तूंचा हट्ट करीत नसे. आपल्या वस्तू ती दुसऱ्यांनाही देत असे. ती दुसऱ्यांना नेहमी मदत करीत असे.

पूजाच्या वाढदिवसाचा कार्यक्रम छान झाला. सर्वांनी खूप धमाल केली. पिंकीची भेट पूजाला सर्वात जास्त आवडली होती. पिंकीने स्वतः तयार केलेले भेटकार्ड पूजा इतरांना पुन्हा पुन्हा दाखवीत होती. तिच्या पालकांनीही पिंकीचे कौतुक केले. स्वतः भेटकार्ड तयार करून आपल्या मैत्रिणीला देण्याचा आनंद पिंकीने मिळवला होता.

**नवीन शब्दांचे अर्थ -**

ग्रिटिंग कार्ड - शुभेच्छा कार्ड
धमाल - मजा
साठविलेले - जमा केलेले
हट्ट - आग्रह

©KTBS Not to be republished

# अभ्यास

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

१. पिंकीचे खरे नाव कोणते?

२. पिंकीने केलेल्या वस्तुंची नावे लिही.

३. पिंकीने भेटकार्ड का तयार केले? तू काय करशील?

४. सुट्टीच्या दिवशी तू कोण कोणती कामे करतोस?


**आ. पिंकीने भेटकार्ड कसे तयार केले? थोडक्यात लिही.**

______________________________

______________________________

______________________________

**इ. झाडाच्या फळात अक्षरे दडली आहेत. ती शोध बरे. व शब्द बनव.**




__________ __________ __________

__________ __________ __________

__________ __________ __________

__________ __________ __________

©KTBS
Not to be republished

## ई. अशा प्रकारचे सुंदर भेटकार्ड तयार कर.



## उ. घराशी संबंधित असणाऱ्या शब्दांना गोल कर.

| | | | |
|---|---|---|---|
| व्हरांडा | अंगण | छत | गोठा |
| खांब | झेंडा | नदी | रस्ता |
| स्वयंपाकघर | गच्ची | जिना | पायवाट |
| ओढा | पूल | खोली | कपाट |

## ऊ. खालील शब्दसमूहास एकच शब्द लिही.

१. जिलेबी, लाडू, पेढा, म्हैसूरपाक. __________

२. गंगा, यमुना, कृष्णा, कावेरी. __________

३. जोंधळा, गहू, तांदूळ, नाचणा. __________

४. बेळगाव, बिदर, धारवाड, कारवार. __________

५. शर्ट, पँट, कोट, जॅकेट. __________

©KTBS Not to be republished

## ए. या कामासाठी तू कोणाकडे जातोस?

१. दळण दळून आणणे. ______________

२. पंक्चर काढणे. ______________

३. दूध खरीदणे. ______________

४. चप्पल शिवून घेणे. ______________

५. केस कापून घेणे. ______________

६. वही पुस्तक खरेदी करणे. ______________

७. मडकी खरेदी करणे. ______________

## ऐ. पाण्यात कोणती वस्तू बुडेल, कोणती वस्तू तरंगेल?

| वस्तू | बुडेल | तरंगेल |
| --- | --- | --- |
| दगड | | |
| कागद | | |
| रबरी चेंडू | | |
| फांदी | | |
| खडू | | |
| पेन्सिल | | |
| पान | | |
| ताट | | |

❖❖❖

©KTBS Not to be republished

## पाठ - १२

# दासवाणी



वाट पुसल्याविण जाऊ नये । फळ वोळखिल्याविण खाऊं  नये।
पडिली वस्तू घेऊं नये। येकायेकी ॥१॥
आळसे सुख मानू नये । चाहाडी मनास आणूं नये।
शोधल्याविण करू नये। कार्य काही ॥२॥
कोणाचा उपकार घेऊ नये। घेतला तरी राखों नये।
परपीडा करू नये । विस्वास घात ॥३॥

**- समर्थ रामदास**

© NBS Not to be republished



## नवीन शब्दांचे अर्थ

पुसल्याविण - विचारल्या शिवाय

पुसणे - विचारणे

वोळखणे - ओळखणे

राखो नये - ठेवून घेऊ नये

पडिली - पडलेली

परपीडा - दुसऱ्यांना त्रास

येकायेकी - एकाएकी, एकदम, विचार न करता

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. वाट चालताना कोणती खबरदारी घ्यावी?

२. कोणते फळ खाऊ नये?

३. पटकन कोणती वस्तू घेऊ नये?

४. सुख कशात मानू नये?

५. कोणाचा उपकार घेतला तरी पुढे काय करावे असे सांगितले आहे?

©KTBS Not to be republished

## आ. नमुन्याप्रमाणे तयार कर.

नमुना :- पर - सुख = परसुख

____ दुःख = ..............

____ ग्रह = ..............

____ लोक = ..............

____ निंदा = ..............

## इ. नमुन्याप्रमाणे तयार कर.

जसे मानू - मानू नये

घेऊ -

देऊ -

करू -

जाऊ -

## ई. कवितेत 'विण' लागून तयार झालेले इतर शब्द शोध.

जसे पुसल्याविण

१. ________________

२. ________________

## उ. या कवितेत 'नये' हा शब्द किती वेळा आलेला आहे. ते शोधून लिही.

## ऊ. समर्थ रामदासांनी लिहिलेले 'मनाचे श्लोक' मिळवून वाच.

❖❖❖

©KTBS Not to be republished

## पाठ - १३

# प्रामाणिकतेचे फळ

वैशाली नावाची एक गरीब मुलगी होती. ती पाचव्या इयत्तेत शिकत होती. घरी आई व वैशाली दोघीच रहायच्या. आई सतत आजारी असायची. घर स्वतःचं होतं. थोडं फार भाडं यायचं. पण तेवढ्याने घरखर्च व शिक्षण खर्च भागायचा नाही. म्हणून वैशाली सकाळी लवकर उठून घरोघरी दुधाच्या पिशव्या व वर्तमानपत्रं पोचवायची. नंतर थोडावेळ चौकात उभी राहून राहिलेली दुधाची पाकीटे व वर्तमानपत्रं विकायची. मग शाळेच्या वेळेत नियमित शाळेला जायची.



एके दिवशी नेहमीप्रमाणे चौकात ती उभी असताना एक साहेब कारमधून आले. त्यानी एक मराठी व एक इंग्रजी दैनिक विकत घेतले. खिशातून शंभराची नोट काढून वैशालीकडे दिली. साहेबांचे पैसे परत देण्यासाठी वैशालीकडे सुटे पैसे नव्हते. ती सुटे पैसे आणण्यासाठी बाजूच्या एका दुकानदाराकडे जाऊन येईपर्यंत ते साहेब गाडी घेऊन

Not to be Republished

जाताना दिसले वैशालीने हे पाहिले व साहेब! साहेब! अशी हाक मारत ती त्यांच्याकडे धावली. पण तेवढ्यात साहेबांची गाडी निघून गेली. मात्र वैशालीने त्या साहेबांच्या गाडीचा नंबर पाहिला. शेवटी शाळेला वेळ व्हायला नको म्हणून ती घराकडे गेली.

दिवसभर वैशालीचे मन शाळेत रमेना. अभ्यासात लक्ष लागेना. त्या साहेबांचे पैसे परत न दिल्याची हुरहूर लागून राहिली होती. संध्याकाळी शाळेहून घरी परत आल्यानंतर वैशालीने आपल्या आईला घडलेली घटना सांगितली. तेव्हा वैशालीला जवळ घेत आईने सांगितले, ‘‘बाळा ते साहेब केव्हा भेटतील तेव्हा त्यांचे पैसे परत दे. दुसऱ्यांचे पैसे असे ठेवून घ्यायचे नाहीत. ते आपल्या मेहनतीचे नसतात. हे ऐकून वैशालीने त्या साहेबांना द्यावे लागणारे पैसे सतत आपल्याकडे असावेत म्हणून आपल्या दप्तरात कंपासपेटीत ठेवून दिले.

वैशाली रोज त्या साहेबांचे पैसे परत करण्यासाठी वाट बघायची. पण त्यांची काही भेट होईना. एके दिवशी वैशाली शाळेत जात असताना अचानक एका औषधाच्या दुकानासमोर वैशालीला त्या साहेबांची गाडी दिसली. वैशालीला अत्यानंद झाला. ती त्या दुकानाजवळ गेली, तिथे ते साहेब तिला दिसले. वैशालीने साहेबांना नमस्कार केला व म्हणाली, ‘‘साहेब! साहेब! एकदा आपण माझ्याकडे वर्तमानपत्र घेऊन शंभर रुपयांची नोट देऊन निघून गेलात. तेव्हा हे घ्या आपले राहिलेले पैसे. माझी आई म्हणते, आपल्या मेहनतीचेच खावे.’’ हे ऐकून साहेबांना तिचे कौतुक वाटले. तिचा स्वभाव, प्रामाणिकपणाही त्यांना आवडला. त्यांनी तिचे नाव, शाळेचा पत्ता विचारून घेतला.

दुसऱ्याच दिवशी ते वैशालीच्या शाळेत आले. मुख्याध्यापकांसोबत बसून वैशालीबद्दल पूर्ण माहिती जाणून घेतली. प्रार्थनेची वेळ असल्याने सर्व विद्यार्थी-शिक्षक एकत्र जमले होते. तिथे साहेबांनी वैशालीला बोलावले. वैशालीच्या प्रामाणिकपणाबद्दल तिचे सर्व मुलांसमक्ष कौतुक केले. इतकेच नव्हे तर तिच्या पुढील शिक्षणाची सर्व जबाबदारी आपण स्वीकारत असल्याचे त्यांनी सांगितले.

©KTBS Not to be republished



मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून वैशालीचे अभिनंदन केले. या सर्व प्रकाराने वैशालीचे डोळे आनंदाश्रूंनी भरले.

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ -

नियमित - न चुकता

दैनिक - रोज प्रसिद्ध होणारे वर्तमान पत्र

मेहनत - कष्ट

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. वैशाली कोणत्या वर्गात शिकत होती?

२. वैशाली सकाळी काय काम करत होती?

३. साहेबांनी वैशालीला किती रुपये दिले?

४. वैशालीने साहेबांचा शोध कसा घेतला?

५. साहेबांनी वैशालीचे सर्व मुलांसमोर कौतुक का केले?

६. वैशालीला आईने काय सांगितले?

**आ. नमुन्याप्रमाणे शब्द तयार कर.**

नमुना :- साभारखत - साखर भात

१) दिलीपाव २) नायराण ३) आत्रमंण ४) गननजा

**इ. तू केलेल्या चांगल्या कामांची यादी कर.**

**ई. अनेकवचन लिही.**

नमुना :- पैसा - पैसे

१. केळे ............ ३. रुपया ............

२. डोळा ............ ४. वही ............

**उ. कंसात दिलेल्या शब्दाचे योग्य रूप गाळलेल्या जागेत भर.**

जसे :- मीना शाळेला ................ (निघाला, निघाली)

मीना शाळेला निघाली.

१. सुधा पत्र लिहीत ................ (होती, होता)

२. सुनील ऐकत ................ (नव्हती, नव्हता)

३. तो ................ (पळाला, पळाली)

४. रमेश शाळेत ................ (आली, आला)

©KTBS Not to be republished

## ऊ. उदा. प्रमाणे शिक्षकांकडून समजून घेऊन लिही.

दैनिक - रोज प्रसिद्ध होणारे.

१. साप्ताहिक ..............................................

२. पाक्षिक ..............................................

३. मासिक ..............................................

४. वार्षिक ..............................................

## ए. योग्य शब्द लिही.

१. मिठ-मीठ .............

२. पीठ-पिठ .............

३. शिवार-शीवर .............

४. बिज-बीज .............

## ऐ. सांग पाहू.

१. तू कोणाला कधी मदत केली आहेस का?

२. तुझ्या घरच्या माणसांनी कोणाला आणि कधी मदत केली आहे का? विचार, ऐक आणि वर्गात सांग.

३. तुझ्या शिक्षकांनी कोणाला, कधी व कशासाठी मदत केली आहे का? ऐकून घे.


४. मोठा झाल्यावर तू कोणाकोणाला मदत करशील? ते लिही.

❖❖❖

©KTBS Not to be republished

## पाठ - १४

# चतुर इसाप



फार फार वर्षापूर्वी ग्रीक देशात घडलेली घटना. त्या देशातील श्रीमंत लोक आपल्या घरात, शेतात किंवा दुकानात काम करण्यासाठी माणसांना गुलाम म्हणून ठेवत. गुलामांचा बाजार असे. तेथे जाऊन श्रीमंत लोक त्यांना विकत आणत. मालक सांगेल ते काम त्या गुलामांना करावे लागे. अशाच एका श्रीमंत व्यापाऱ्याकडे इसाप नावाचा गुलाम होता. तो दिसायला कुरूप, अंगाने अशक्त व बुटका होता. इसाप दिसायला कुरूप असला तरी तो हुशार होता.

एकदा इसापचा मालक व्यापाराच्या निमित्ताने परगावी जाण्यास निघाला. पंधरा ते वीस दिवसांचा प्रवास होता. त्या काळात परगावी जाताना मुक्कामाच्या ठिकाणी

© KTBS Not to be republished

लागणारे सर्व साहित्य घेऊन जावे लागे. सर्व गुलामांनी व्यापाराच्या वस्तू व इतर वस्तू यांची अनेक गाठोडी तयार केली. इसापच्या मालकाने सर्व गाठोडी पाहिली. मालक अतिशय चांगला माणूस होता. इसाप त्याचा आवडता गुलाम होता. त्याने सर्व गुलामांना एकत्र बोलवून सांगितलं की इसाप अशक्त आहे. तुमच्यापेक्षा लहानही आहे. म्हणून त्याला झेपेल असे गाठोडे द्या. त्याने सर्व प्रथम इसापला सांगितले, की ''या पैकी कोणतेही एक गाठोडे तू घे.'' इसापने सर्वात मोठे असलेले अन्न-धान्याचे गाठोडे उचलले. ते पाहून सर्वजण हसू लागले. त्याच्या मालकासही नवल वाटले. सगळ्यानी इसापला वेडा ठरविला. इसाप फक्त हसला.

मालक व्यापाराच्या निमित्ताने रोज एका गावाहून दुसऱ्या गावी जाऊ लागला. मुक्कामाच्या ठिकाणी दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण होत असे. परत दुसऱ्या दिवशी सामानाची गाठोडी घेऊन पुढचा प्रवास चालू होत असे. वाटेत चालत जात असताना इसाप इतरांना विचारायचा, ''काय म्हणतंय तुझं ओझं?'' इतर गुलामांना समजेना की इसाप असे का विचारतो. सगळेच म्हणणार, ''ओझं काय म्हणणार ते बोजडच होतंय.'' परंतु इसाप त्यांना हसायचा व पुढे जायचा.

आठ दिवसानंतर इतर गुलामांच्या लक्षात आलं की इसाप जवळील गाठोड्यातील अन्नधान्य हळूहळू कमी होत आहे. प्रवासाच्या शेवटच्या दिवशी इसापजवळ काहीही शिल्लक नव्हते. तो आनंदाने सर्वांची चेष्टा करत प्रवास करत होता. इसापच्या चतुराईची जाणीव सगळ्यांना झाली. त्याचा मालकसुद्धा खुश झाला. काही दिवसानंतर त्याने इसापच्या हुशारीचे कौतुक केले. त्याला बक्षीस देऊन गुलामगिरीतून मुक्त केले. इसापची हुशारी पाहून ग्रीक देशाच्या राजाने त्याला आश्रय दिला. इसापने सांगितलेल्या अनेक गोष्टी आपण 'इसापनीती' म्हणून वाचतो. 'पंचतंत्र' हे गोष्टींचे पुस्तक भारतीय मुलांना जसे आवडते तसे युरोपातील मुलांना 'टेलस् ऑफ इसाप' म्हणजे 'इसापने सांगितलेल्या गोष्टी' हे पुस्तक अतिशय आवडते

©KTBS Not to be republished

C M Y K

## नवीन शब्दांचे अर्थ -

घटना - घडलेला प्रसंग
कुरूप - दिसायला चांगला नसलेला
ओझे - बोजा, भार
चतुराई - हुशारी
बुटका - कमी उंचीचा
अशक्त - कमी शक्तीचा
बोजड - अवजड, जास्त वजनाचे

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. श्रीमंत लोक गुलाम का ठेवत?

२. इसाप कसा होता?

३. इसापचा मालक कोठे जाणार होता?

४. इसापने कोणते गाठोडे उचलले?

५. इसाप इतर गुलामांना कोणता प्रश्न विचारत असे?

### आ. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिही.

१. इसापचा मालक कसा होता?

२. इसापने अन्नधान्याचे गाठोडे का उचलले?

### इ. रिकाम्या जागा भर.

१. सगळ्यानी इसापला ................. ठरविले.

२. इसाप आनंदाने ................. करत प्रवास करत होता.

©KTBS Not to be republished

३. इसापच्या .................ची जाणीव सगळ्याना झाली.

४. त्याला बक्षीस देऊन ................. मुक्त केले.

## ई. विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. गरीब | अ. उंच |
| २. चांगला | आ. श्रीमंत |
| ३. कुरूप | इ. वाईट |
| ४. बुटका | ई. सुंदर |

## उ. नमुन्याप्रमाणे लिही.

उदा. मूल - मुलांना

१. फूल .............

२. फळ .............

३. ढग .............

४. थेंब .............

**ऊ.** १. इसापनीतीतील इतर कथा वाच.

२. पंचतंत्रातील कथा शिक्षकांकडून ऐक.

३. 'हितोपदेश' या नावाचे कथांचे पुस्तक आहे. त्यातील कोणतीही एक कथा शिक्षक, पालक किंवा गावातील मोठ्या व्यक्तीकडून ऐक.

❖❖❖

©KTBS Not to be republished

# पाठ - १५

# झोका



झुईं झुईं झोका
झाडावर टांगा,
झोक्यासाठी लावा
भरभर रांगा.

गूळ खोबरं पेढा
आणा कुणी शेंगा
आळी पाळी बसू
नका करू दंगा.

वर खाली वर
झोका आला वेगा
पोटा मधि माझ्या
गुईं गुईं भुंगा.



उंच गेला झोका
दादा झाला ठेंगा
ताईला वाकुल्या
डिंग डिंग डिंगा

©KTBS Not to be republished

गार गार हवा
शहारते अंगा
मजा आली किती
वारा घाली पिंगा.

आई देता झोका
खेळ आला रंगा
सुख मोठे कुठे
याच्याहुनि सांगा!

**- हेमंत मुश्रीफ**

©KTBS Not to be republished

## नवीन शब्दांचे अर्थ -

टांगणे - लटकाविणे
ठेंगा - लहान, बुटका
शहारणे - अंगावर काटा येणे
वेगा - वेगाने, जोराने
भुंगा - एक प्रकारचा किडा
वाकुल्या दाखविणे - चिडविणे
पिंगा - गोल फिरणे

## अभ्यास

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. झोका कशावर टांगला आहे?

२. खाण्यासाठी कोणकोणते पदार्थ आणण्यास सांगितले आहे?

३. झोका खेळताना आपण कसे वागले पाहिजे?

४. झोका वर खाली झाला म्हणजे पोटामध्ये काय होते?

५. दादा ठेंगा कसा झाला?

६. अंग कशामुळे शहारते?

७. मोठे सुख कोणते?

## आ. नमुन्याप्रमाणे कवितेच्या आधारे तालबद्ध शब्द लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| नमुना :- | टांगा | - | रांगा |
| | शेंगा | - | ............ |
| | वेगा | - | ............ |
| | ठेंगा | - | ............ |
| | अंगा | - | ............ |
| | रंगा | - | ............ |


## ई. कवितेच्या ओळी पूर्ण कर

| | |
|---|---|
| नमुना :- झोक्यासाठी लावा | भराभर रांगा |
| १. आळी पाळी बसू | .................... |
| २. पोटामधि माझ्या | .................... |
| ३. ताईला वाकुल्या | .................... |
| ४. मजा आली किती | .................... |
| ५. सुख मोठे कुठे | .................... |

©KTBS Not to be republished

ई. कविता तोंडपाठ कर.

उ. चौकोनाबाहेर दिलेल्या नावाप्रमाणे चौकोनात वर्तुळातील योग्य शब्द लिही.




ए. आपण कोणकोणत्या सणांच्या दिवशी झोका बांधून खेळतो?

❖❖❖

©KTBS Not to be republished

# पाठ - १६

# धाडसी दयानंद



©KTBS Not to be republished

दयानंद कारवारजवळील एका छोट्याशा खेड्यात रहात होता. त्याचे गाव समुद्रकिनाऱ्याशी लागूनच होते. दयानंद बिचारा मुका होता. आपल्या सवंगड्यांबरोबर खेळताना हातवारे करून, खुणा करून बोलायचा. त्याची ही मूक भाषा त्याच्या मित्रांना पटकन कळायची.

दररोज समुद्रकिनाऱ्यावर जाऊन खेळणे त्याला फार आवडे. समुद्राच्या फेसाळणाऱ्या, गर्जणाऱ्या, अक्राळ विक्राळ लाटांकडे तो टक लावून पाहायचा. दूरवर पसरलेला निळा निळा समुद्र बघण्यात तो रंगून जायचा. त्याला खूप खूप आनंद व्हायचा.

दयानंद दररोज आपल्या मित्रांबरोबर वाळूत खेळायचा. शंख-शिंपले गोळा करणे हा तर त्याचा आवडता छंद! छोटे-मोठे, लाल-काळे, टोकदार आणि रंगीबेरंगी शंख शिंपले सर्वांत जास्त दयानंदकडेच होते. हा खजिना दयानंद खूप जपायचा.

रोज पहाटे सर्वांत आधी दयानंद समुद्रकिनाऱ्यावर हजर असायचा. बोलता येत नसल्याने तो कधी कधी उदास व्हायचा. आपल्या इतर मित्रांप्रमाणे मलाही बोलता आले असते तर किती बरे झाले असते! असे विचार त्याच्या मनात नेहमी यायचे. पण निळा निळा समुद्र पाहिला की, त्याचे दुःख दूर पळून जायचे. समुद्रच त्याचा जिवलग मित्र बनला होता.

एके दिवशी त्याला लवकर जाग आली. अजून पहाट व्हायची होती. त्याला झोप येत नव्हती. त्याला समुद्राची आठवण झाली. अंधुक प्रकाशात तो समुद्रकिनाऱ्याच्या दिशेने जाऊ लागला. गार गार वारा अंगाला झोंबत होता. किनाऱ्यावर पोहोचताच तो वाळूत बसला. पहाटेच्या धूसर प्रकाशात दूरवर अथांग पसरलेला सागर न्याहाळू लागला.

आता बरेच उजाडले होते. तो उठला व लाटांबरोबर खेळू लागला. शाळेला सुट्टी असल्यामुळे गावातील बरीच मुले समुद्रकिनाऱ्यावर खेळण्यासाठी जमली होती. कोणी वाळू उडवत होते, तर कोणी पळापळी करत होते. कोणी वाळूत रेघोट्या मारत होते. तर कोणी वाळूत आपली नावे लिहीत होते. कोणी वाळूत नक्षी काढत होते. तर कोणी किल्ले बांधत होते. दयानंदही किल्ला बांधणाऱ्या मुलांत सामील झाला. सर्वजण खेळण्यात दंग झाले होते.

इतक्यात एकच गलका झाला. ''तो बघा बुडाला! छोटा पवन बुडाला!'' असे सर्वजण ओरडू लागले. सर्वांच्या नजरा समुद्रात बुडणाऱ्या पवनकडे गेल्या. जो तो, ''पवनला वाचवा! पवनला वाचवा!'' म्हणू लागला. पण कोणीच पुढे होईना. एकच गर्दी झाली. हे दयानंदच्या दृष्टीस पडताच तो पटकन उडी मारून उभा राहिला. गर्दीतून वाट काढत समुद्रात बुडणाऱ्या पवनच्या दिशेने पळू लागला. क्षणार्धात त्याने समुद्रात उडी घेतली. सर्वजण भयभीत नजरेने पाहू लागले.

©KTBS Not to be republished



बघता बघता दयानंद समुद्रात बुडणाऱ्या पवनजवळ पोहोचला. त्यानं पवनला आधार दिला. मोठ्या हिंमतीने पवनला समुद्रकिनाऱ्यावर आणले. त्याला खूप दम लागला होता. नाकातोंडात पाणी गेलेला पवन हळुहळू शुद्धीवर आला. भेदरलेल्या नजरेने तो सर्वांकडे पाहू लागला. पवन मरता मरता वाचला होता. दयानंदच्या धाडसाने पवनचा प्राण वाचला होता. गावकऱ्यांनी मुक्या दयानंदच्या धाडसाचे कौतुक केले. मुलाच्या कर्तृत्वाने दयानंदच्या आईचा ऊर भरून आला. डोळ्यात आनंदाश्रू आले. धाडसी दयानंदला सर्वांनी शाबासकी दिली. दयानंद मुका असला तरी सर्वांचा तो आता लाडका मित्र बनला होता. ग्रामपंचायतीने दयानंदचा सत्कार केला.

## नवीन शब्दांचे अर्थ -

सवंगडी - मित्र,
छंद - आवड
झोंबणे - झणाणणे, स्पर्शकरणे
धूसर - कमी प्रकाश
अथांग - अंदाज येत नाही असा
सामील - सहभागी
भयभीत - घाबरलेला
गर्जना - मोठा आवाज
अंधुक - थोडा थोडा प्रकाश
अक्राळ विक्राळ लाटा - प्रचंड मोठ्या लाटा
उदास - दुःखी
न्याहळणे - निरखणे
क्षणार्धात - पटकन
ऊर - छाती

©KTBS Not to be republished

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. दयानंद कोणत्या भाषेत बोलायचा?

२. दयानंदला खूप आनंद केव्हा व्हायचा?

३. दयानंदचा आवडता खजिना कोणता?

४. समुद्रामध्ये कोण बुडत होता?

५. दयानंदला सर्वांनी शाबासकी का दिली?

## आ. नमुन्याप्रमाणे अनेकवचन लिही.

लाट - लाटा

१. किल्ला -

२. मासा -

३. शिंपला -

४. मूल -

५. समुद्र -

लक्षात ठेव - मूळ शब्दाचे अनेकवचन करताना बऱ्याचदा मूळ शब्दात बदल करावा लागतो.

## इ. विरुद्ध अर्थाच्या जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. मुका | रात्र |
| २. आवडता | बोलका |
| ३. काळा | मोठा |
| ४. लहान | नावडता |
| ५. दिवस | पांढरा |

Not to be republished ©KTBS

## ई. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. समुद्रातून आपल्याला काय काय मिळते?

२. तुझे छंद कोणते?

३. बुडणाऱ्या मुलाला वाचविण्यासाठी तू काय करशील?

## उ. रिकाम्या जागी कंसात दिलेले शब्द योग्य रीतीने भर.

(धाडसाने, छंद, झोंबत, दंग, शाबासकी)

१. सर्वजण खेळण्यात .................. झाले होते.

२. दयानंदला सर्वांनी .................. दिली.

३. शंख-शिंपले जमा करणे हा त्याचा .................. होता.

४. गार वारा अंगाला .................. होता.

५. दयानंदच्या .................. पवनचा प्राण वाचला.

## ऊ. ध्वनिदर्शक शब्द सांग.

नमुना - पाणी पीतो - घटाघटा

१. केस उडतात - ____________

२. झरा वाहतो - ____________

३. दार वाजते - ____________

४. पानांची होते - ____________

५. पावसाची होते - ____________

६. पंखांची होते - ____________

©KTBS Not to be republished

## ए. नमुन्याप्रमाणे जोडशब्द शोधून लिही.

| नमुना - अक्राळ | विक्राळ | आक्राळ विक्राळ |
|---|---|---|
| १. अवती | १. घडण | ________ |
| २. अंगत | २. जंमत | ________ |
| ३. आडवा | ३. गमत | ________ |
| ४. गंमत | ४. उतार | ________ |
| ५. केर | ५. भवती | ________ |
| ६. चढ | ६. पंगत | ________ |
| ७. रमत | ७. तिडवा | ________ |
| ८. जडण | ८. कचरा | ________ |

## चित्र रंगव



©KTBS Not to be republished

C M Y K

## पाठ - १७

# चांगल्या सवयी



©KTBS Not to be republished

आज ताईंनी वर्गात एक आंब्याचे रोपटे लावलेली कुंडी आणली. सर्व मुले उत्सुकतेने त्या छोट्याशा आंब्याच्या रोपट्याकडे पाहू लागली. तेवढ्यात ताई म्हणाल्या, हे कशाचे रोपटे आहे?

मुले : हे आंब्याचे रोपटे आहे.

ताई : या आकाराचे रोपटे उपटून काढावयाचे असेल तर, तुम्हाला किती बोटे वापरावी लागतील?

मुले : त्यात काय? दोन बोटांच्या चिमटीने सहज उपटता येईल.

ताई : समजा, हे रोपटे गुढघाभर उंचीचे झाले तर ते कसे उपटाल?

मुले : खोड मुठीत धरून ते उपटता येईल.

ताई : समजा, हे रोपटे तुमच्या कमरे इतक्या उंचीचे झाले तर ते कसे उपटाल?

मुले : तेव्हा मात्र दोन्ही हातांचा जोर लावून उपटून काढावे लागेल.

ताई : आणि, समजा पाच वर्षांनी या रोपट्याचे मोठे झाड झाले, तर ते कसे उपटाल?

मुले : तेव्हा ते उपटता येणार नाही. त्याला कुऱ्हाडीने तोडावे लागेल! पण त्याची मुळे जमिनीत खोल गेलेली असतील.

ताई : अगदी बरोबर! झाड एकदा मोठे झाले की ते उपटणे अशक्य असते. वाईट सवयींचे देखील असेच असते. लहानपणीच त्या पटकन घालवता येतात. सवय ही झाडाप्रमाणे वाढत जाते. वयाची सोबत करते. म्हणून तिला स-वय म्हणतात.

उशीरा उठणे, घाईत अंघोळ करणे, अस्पष्ट उच्चार करणे, अभ्यासाच्या वेळी चलबिचल करणे, मोठ्यांना उलट उत्तरे देणे, खूप मोठ्या आवाजात बोलणे, जेवणाच्या ताटात अन्न टाकणे, खूप वेळ टी.व्ही. पाहणे, वस्तू जागेवर न ठेवणे, दुसऱ्यांच्या वस्तू न विचारता घेणे, वेडेवाकडे अक्षर काढणे, वेळेवर अभ्यास न करणे या वाईट सवयी लहानपणीच घालवल्या पाहिजेत.

चांगल्या सवयी वाढणाऱ्या झाडाप्रमाणे हळूहळू रुजविल्या पाहिजेत. वाईट सवयी मात्र बालवयातच उपटून काढल्या पाहिजेत. ताईंच्या सूचनेप्रमाणे सर्व मुलांनी चांगल्या सवयींचीच सवय लावून घेण्याचा निश्चय केला. कारण ताईंची 'सूचना' मुलांना मनापासून पटली होती.

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचे अर्थ :-**

रुजविणे - बिंबविणे

उत्सुकता - उत्कट इच्छा, कुतूहल

निश्चय -ठाम मत

C M Y K

# अभ्यास

## अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. कुंडीमध्ये कोणते रोपटे होते?

२. रोपटे उपटण्यासाठी दोन्ही हातांचा जोर केव्हा लागेल?

३. वाईट सवयी कोणत्या व त्या केव्हा घालवाव्यात?

४. झाडासारखी वाढत जाणारी गोष्ट कोणती?

५. मुलांनी शेवटी काय ठरविले?

## आ. चांगल्या सवयींची यादी कर.

## इ. विरुद्धार्थी शब्द लिही.

उदा. छोटा x मोठा

१. खरे x

२. सत्य x

३. चांगले x

४. शिस्त x

५. गरीब x

६. गोड x

## ई. समूहदर्शक शब्द लिही.

उदा. करवंदाची - जाळी

१. केवड्याचे -

२. गवताची -

३. गुरांचा -

४. पुस्तकांचा -

५. मुंग्यांची -

Not to be republished ©KTBS

## उ. जोड्या जुळव

| 'अ' | 'ब' |
| --- | --- |
| १. अक्षर | १. असू नयेत |
| २. वाईट सवयी | २. वेळेवर करावा |
| ३. अभ्यास | ३. आदराने वागावे |
| ४. मोठ्यांशी | ४. विचारून घ्याव्यात |
| ५. दुसऱ्यांच्या वस्तू | ५. वळणदार असावे. |

## ऊ. नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना :- बस - बसावे

१. ऊठ -

२. पळ -

३. पी -

४. खा -

५. कर -

६. धर -

## ए. तू कोण कोणती कामे करतोस. ती कामे लिही.

| घरातील कामे | घराबाहेरील कामे |
| --- | --- |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

©KTBS Not to be republished

## ऐ. कंसातील शब्द वापरून वाक्ये पूर्ण कर.

(पटापट, भळभळ, सावकाश, सरसर, झुळझुळ)

१. जेवण ...................... करावे.

२. झरा ......................वाहतो.

३. मुले गाडीत ...................... बसली.

४. खार झाडावर ...................... चढली.

५. जखमेतून रक्त ...................... वाहू लागले.





©KTBS
Not to be republished

C M Y K

# पाठ - १८

# संतवाणी




© KTBS Not to be republished

**(१)**

बैसू खेळूं जेवूं । तेथे नाम तुझे गाऊं ।।
रामकृष्ण नाममाळा । घालूं ओवुनियां गळा ।।
विश्वास हा धरूं। नाम बळकट करूं ।।
तुका म्हणे आतां । आम्हां जीवन शरणागता ।।

**(२)**

कौतुक वाणी । बोलू बोबड्या वचनी ।।
हे तो नसावे अंतरी । आम्हा राखायचे दुरी ।।
स्तुती आणि निंदा । माना समचि गोविंदा ।।
तुका म्हणे बोले । मज तुम्ही शिकविले ।।

**- संत तुकाराम**

C M Y K

## नवीन शब्दांचे अर्थ :-

| | |
|---|---|
| नाम - नाव | स्तुती - प्रशंसा, कौतुक |
| नाममाळा - जपाची माळ | निंदा - दोषवर्णन |
| वाणी - वाचा, भाषण | समचि - समान |
| वचनी - शब्दांनी | मज - मला |
| दुरी - दुरावा | अंतरी -मनामध्ये |

## अभ्यास

©KTBS Not to be republished

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. भगवंताचे नाव केव्हा गावे?

२. कुणाच्या नामाची माळ गळ्यात घालावी?

३. स्तुती आणि निंदा कशी मानावी?

४. अंतरी काय नसावे?

### आ. खालील ओळी पूर्ण कर.

१. बैसू खेळूं जेवूं । ............................ ॥

२. ............................ । घालू ओवुनियां गळा ॥

३. कौतुक वाणी । ............................ ॥

४. ............................ । माना समचि गोविंदा ॥

## इ. यांचे कंसात दिलेले वाहन शोधून लिही.

(वाघ, मोर, गरुड, रेडा, उंदीर, नंदी)

उदा. गणपती - उंदीर

१. विष्णू - ................

२. दुर्गा - ................

३. शिव - ................

४. यमदेव - ................

५. सरस्वती - ................

## ई. खालील चौकटीतील संतांची नावे शोधून काढ व लिही.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रा | फ | ग | ज | ज्ञा |
| प | म | स | न | ने |
| व | रा | दा | ई | श्व |
| दे | का | सी | स | र |
| म | तु | ल | चो | खा |
| ना | क | तु | रा | ज |

१. ____________ ५. ____________

२. ____________ ६. ____________

३. ____________ ७. ____________

४. ____________

©KTBS Not to be republished

## उ. खालील शब्द वाच व पुन्हा लिही.

१. रामकृष्ण ________________

२. विश्वास ________________

३. कौतुक ________________

४. स्तुती ________________

## ऊ. खालील शब्द वाच व शुद्ध करून लिही.

उदा. :- रामकुष्ण - रामकृष्ण

१. वीश्वास -

२. जिवन -

३. कोतुक -

४. अंतंरी -

५. स्तुति -

६. तुत्पी -

©KTBS
Not to be republished

ए. खालील ओळी वाच व लिही.

१. सकाळी लवकर उठावे.

२. आईवडिलांचा आदर करावा.

३. शाळेला नियमितपणे जावे.

४. दररोज व्यायाम करावा.

❖❖❖

©KTBS Not to be republished

# शब्दसंग्रह



## अ

अक्राळ विक्राळ
अश्रू
अर्पण
अशक्त
अथांग
अत्यानंद
अशक्य
अभिमान

## आ

आतुरता
आळीपाळी
आखणे
आश्रय

## इ

इवले
इमानी
इसाप
इंग्रज

## ऊ

उदास
उत्सुकता
उपटणे
उजाडणे

## ए

एकाग्रता

## ऐ

ऐटदार

## ओ

ओवा

## अं

अंग
अंधुक
अंकुर
अंतरी

## क

कार्य
कौशल्य
कर्तव्य
काळोख
कुंडी
कुरूप
कार्यक्रम
कोट
किनारा

## ख

खजिना

## ग

गगन
गट्टी
गर्जना
गलका
गुपित
गुलाम
गुंग
गोंडेदार
ग्रिटिंग

## घ

घाट

## च

चहूकडे
चलबिचल
चतुर
चिंब
चेष्टा
चोपणे
चौक

©KTBS
Not to be republished

## ज

जनता

जयगान

जानेवारी

जॅकेट

## झ

झुलणे

झोका

झोंबणे

## ठ

ठीक

ठेंगा

## द

दप्तर

दम

दर्शन

दूर्वा

दैनिक

दुष्ट

दृष्टी

दंगा

## ध

धिटाई

धैर्य

## न

नाम

नाद

नाराज

निशाण

निर्भय

निंदा

नक्की

न्याहळणे

## प

परपीडा

पहाड

पक्का

पराक्रम

पालक

पिंगा

पत्रिका

पुढारी

पुढाकार

प्रणाम

प्लॅस्टर

पँट

पंक्चर

प्रार्थना

## फ

फलाट

फेसाळ

फ्रॅक्चर

## ब

बागडणे

बिचकणे

बोगदा

बोजड

## भ

भयभीत

भेदणे

भेदरणे

भोवणे

भांडण

भुंगा

## म

मज

महान

मनोरंजन

महत्व

मनसोक्त

मुख

मुक्त

मूक

मेघ

मंद

## य

युरोप

©KTBS Not to be republished

## र

रहदारी
रस
रान
रुजविणे
रोपटे
रेलतळ

## ल

लग्न
लपंडाव
लक्ष

## व

वचन
वन
वर्तमानपत्र
वनस्पती
वाणी
वाकुल्या
वातावरण
वीर
वैद्य

## श

शर्ट
शहारणे
शिर
शीळ
शुद्ध
शुभेच्छा
शरणागत
शंभर

## स

सर्दी
सजा
सत्कार
सल्ला
सागर
साहित्य
साचणे
सिग्नल
सुस्ती
सूचना
सोबत
स्वाभिमान
स्केचपेन

## ह

हट्ट
हार
हिरमुसणे
हुरहुर

## श्र

श्रीमंत



©KTBS Not to be republished